# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग - दोन

## गुरुवार, दिनांक २ डिसेंबर, २०२१ / अग्रहायण ११, (१९४३ शके)

संदर्भ :- या सचिवालयाचे पत्रक भाग-दोन क्र.८१, दिनांक १४ ऑक्टोबर, २०२१

९८ . **या सचिवालयाच्या संदर्भाधीन पत्रक भाग - दोन मध्ये सुधारणा करुन खालील प्रमाणे सुधारित पत्रक भाग - दोन निर्गमित करण्यात येत आहे.**

विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या सोमवार, दिनांक २९ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार आगामी तृतीय (हिवाळी) अधिवेशन, २०२१ मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या ऐवजी बुधवार दिनांक २२ डिसेंबर, २०२१ रोजी विधानभवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. त्यानुसार मा.मंत्री महोदयांना तारांकित प्रश्नांचे उत्तर देण्यासाठी मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी पुढील प्रमाणे सुधारित दिवस नेमून दिले आहेत

तसेच पहिल्या आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे सदस्यनिहाय बॅलट सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता व त्यापुढील आठवड्यातील तारांकित स्वीकृत प्रश्नांचे बॅलट त्यानंतरच्या प्रत्येक सोमवारी दुपारी ४.०० वाजता उप सचिव/अवर सचिव यांच्या दालनात घेण्यात येईल. याबाबतची माहिती पत्रक भाग दोनद्वारे स्वतंत्ररित्या मा.सदस्यांना कळविण्यात येईल. सदरहू बॅलटसाठी मा.सदस्यांना उपस्थित राहता येईल. **परंतु त्यांना प्रवास किंवा दैनिक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

## सुधारित विवरणपत्र

| गट क्र. | गटामध्ये समाविष्ट असलेले मंत्री | | प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक | सुधारित प्रश्नांच्या उत्तराचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| एक | (१) उप मुख्यमंत्री<br>(२) जलसंपदा व लाभक्षेत्र विकास मंत्री<br>(३) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(४) ग्रामविकास व कामगार मंत्री<br>(५) वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्य मंत्री<br>(६) महिला व बालविकास मंत्री<br>(७) मृद व जलसंधारण मंत्री | | सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१ | सोमवार, दिनांक २७ डिसेंबर, २०२१ |
| दोन | (१) मुख्यमंत्री<br>(२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री<br>(३) गृहनिर्माण मंत्री<br>(४) नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | | मंगळवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२१ | मंगळवार, दिनांक २८ डिसेंबर, २०२१ |
| तीन | (१) गृह मंत्री<br>(२) महसूल मंत्री<br>(३) पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(४) कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री<br>(५) रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री<br>(६) वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री | | बुधवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२१ | बुधवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| चार | (१) अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री<br>(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री<br>(३) अल्पसंख्याक विकास व औकाफ, कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री<br>(४) शालेय शिक्षण मंत्री<br>(५) उच्च व तंत्रशिक्षण मंत्री<br>(६) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(७) परिवहन, संसदीय कार्य मंत्री<br>(८) पर्यटन, पर्यावरण व वातावरणीय बदल राजशिष्टाचार मंत्री | | गुरुवार, दिनांक ९ डिसेंबर, २०२१ | गुरुवार, दिनांक २३ डिसेंबर, २०२१ |
| पाच | (१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री<br>(२) उर्जा मंत्री<br>(३) इतर मागास बहुजन कल्याण,खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री<br>(४) आदिवासी विकास मंत्री<br>(५) सहकार, पणन मंत्री<br>(६) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री | | शुक्रवार, दिनांक १० डिसेंबर, २०२१ | शुक्रवार, दिनांक २४ डिसेंबर, २०२१ |

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २ डिसेंबर, २०२१

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
(३) संगणक कक्ष (Website)